त्रि-सदस्यीय महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाकरिता सुधारित आस्थापना मंजूर करणेबाबत.......

# महाराष्ट्र शासन
## अल्पसंख्याक विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः वक्फ २०१५/प्र.क्र. १४२/कार्यासन-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई
तारीख: ३ ऑगस्ट, २०१६

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र. वक्फ २०१३/प्र.क्र.२७९/का.४ दि.२८/०४/२०१४.

२) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय यांचे पत्र (इंग्रजी) क्र. B(Gen)-५६०१/५७/२०१५/९१२, दि.०६/१०/२०१५.

**प्रस्तावना -**

वक्फ अधिनियम १९९५ (१९९५ चा ४३वा) हा केंद्रीय कायदा देशात दि.०१/०१/१९९६ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर मूळ कायद्याच्या कलम ८३ च्या पोटकलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.वक्फ १०९७/प्र.क्र.९४/ल-३, दि.३० ऑक्टोबर, २००० अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद ची व तद्नंतर कालांतराने, शासन अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र.वक्फ १०/२००२/प्र.क्र.७८/ल-३, दिनांक १२ डिसेंबर, २००३ अन्वये, “महाराष्ट्र राज्यातील नागपूर महसूली विभाग” अशी अधिकारिता असलेले, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, नागपूर या एक सदस्यीय वक्फ न्यायाधिकरणांची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ (२०१३ चे २७ वे) अन्वये वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये आता सुधारणा करण्यात आलेल्या असून, कलम ८३(४) येथील सुधारीत तरतुदीनुसार राज्य वक्फ न्यायाधिकरण हे त्रि-सदस्यीय करणे आता अनिवार्य झाले आहे. त्याचप्रमाणे वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ८३(५) मधील तरतुदींनुसार वक्फ न्यायाधिकरणाला आता दिवाणी न्यायालयाचा दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद हे त्रि-सदस्यीय करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद साठी वरील संदर्भ क्र. १ येथे उल्लेखित शासन निर्णयान्वये, पिठासिन अधिकारी - १ पद, अधीक्षक - १ पद, लेखापाल (लिपिक) - १ पद, अव्वल कारकून - १ पद, लघुटंकलेखक - १ पद, टंकलेखक - १ पद, वाहन चालक - १ पद व शिपाई-२ पदे; अशी एकूण ९ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

तथापि, वरील परिच्छेद क्र.२ येथे नमूद पार्श्वभुमी तसेच, प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय यांनी त्यांच्या वरील संदर्भ क्र.२ येथे उल्लेखित पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली, दिवाणी न्यायालयाकरिता मंजूर असलेली पदे व पदसंख्येबाबतची माहिती विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद साठी वरील संदर्भ क्र.१ येथे उल्लेखित शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या आस्थापनेची पुनर्रचना करणे आवश्यक झालेले आहे. सद्य:स्थितीत एक कायदेशीर गरज म्हणून वक्फ न्यायाधिकरणाच्या आस्थापनेची पुनर्रचना करुन आवश्यकतेनुसार नवीन पदांची निर्मिती करणे, अनावश्यक पदे वगळणे व काही पदांचे अन्य पदांत रुपांतरण करुन महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद आस्थापनेची पुनर्रचना करण्याच्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०५.०७.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे. या पार्श्वभूमीवर वरील संदर्भ क्र. १ येथे उल्लेखित शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबादसाठी सुधारीत आस्थापना मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

**शासन निर्णय -**

३. वरील संदर्भ क्र. १ येथे उल्लेखित शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद साठी पुढे नमूद केल्याप्रमाणे सुधारीत आस्थापना मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे -

| अ. क्र. | पदनाम | ६ व्या वेतन आयोगानुसार पे बॅण्ड व ग्रेड वेतन | प्रस्तावित पदसंख्या | सध्या अस्तित्वात असलेली पदसंख्या | नव्याने निर्माण करावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | जिल्हा, सत्र किंवा दिवाणी न्यायाधिश, प्रथम वर्ग या संवर्गातून प्रतिनियुक्तीने भरावयाचे पद | १ | १ | - |

| अ. क्र. | पदनाम | ६ व्या वेतन आयोगानुसार पे बॅण्ड व ग्रेड वेतन | प्रस्तावित पदसंख्या | सध्या अस्तित्वात असलेली पदसंख्या | नव्याने निर्माण करावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|
| २ | सदस्य (राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी) | १५,६००-३९,१००+ग्रे.पे. ७,६०० | १ | - | १ |
| ३ | सदस्य (मुस्लीम कायद्याचे ज्ञान व आकलन असलेली व्यक्ती) | १५,६००-३९,१००+ग्रे.पे. ७,६०० | १ | - | १ |
| ४ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ९,३००-३४,८०० + ग्रे.पे. ४,३०० | ३ | १ (सध्याचे लघुटंकलेखक पद रुपांतरीत करुन) | २ |
| ५ | सहायक अधिक्षक (न्यायालयीन आस्थापनेवरील पद व वेतन बॅण्ड) | ९,३००-३४,८०० + ग्रे.पे. ४,४०० | १ | १ (सध्याचे अधीक्षक पद रुपांतरीत करुन) | - |
| ६ | वरिष्ठ लिपिक | ५,२००-२०,२०० + ग्रे.पे. २,४०० | २ | - | २ |
| ७ | लेखापाल (लिपिक) | ५,२००-२०,२०० + ग्रे.पे. २,४०० | १ | १ | - |
| ८ | लिपिक-टंकलेखक | ५,२००-२०,२०० + ग्रे.पे. १,९०० | १ | १ (टंकलेखक पद रुपांतरीत करुन) | - |
| ९ | वाहन चालक | ५,२००-२०,२०० + ग्रे.पे. १,९०० | ३ | १ | २ |
| १० | बेलीफ | ५,२००-२०,२०० + ग्रे.पे. १,९०० | १ | - | १ |
| ११ | शिपाई | ४,४००-७,४४० + ग्रे.पे१,३०० . | ५ | २ | ३ |
| | **एकूण** | | **२०** | **८*** | **१२** |

***टीप : १) आधी मंजूर असलेले अव्वल कारकूनन हे पद वगळण्यात आलेले आहे.** १) न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व २ सदस्यांकरिता प्रत्येकी, १ लघुलेखक (निम्नश्रेणी)-१, शिपाई व वाहनचालक प्रत्येकी १ असा कर्मचारीवृंद मंजूर करण्यात आलेला आहे. सध्या न्यायाधिकरण हे जिल्हाधिकारी कार्यालयात स्थित असल्याने स्वीपर व वॉचमन पदांची आवश्यकता नाही.

२) वाहनचालक व शिपाई ही पदे बाह्ययंत्रणेद्वारा भरण्यात यावीत.

३) सहायक अधिक्षक व लघुलेखक (निम्नश्रेणी) ही पदे एकाकी पदे असून त्यांना पदोन्नतीसाठी पदे उपलब्ध असणार नाहीत.

४) सहाय्यक अधिक्षक हे पद न्यायालयीन आस्थापनेवरुन प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे. या पदासाठी नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय असेल.

४. वर नमूद पदांपैकी अध्यक्ष व सदस्यांच्या पदावरील नियुक्ती शासन स्तरावरुन करण्यात येईल. उर्वरित पदांच्या बाबतीत विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी या पदापैकी रिक्त असलेली पदे पारदर्शक पध्दतीने राज्यस्तरीय मराठी, उर्दू व इंग्रजी

वर्तमानपत्रांत जाहिरात प्रसिध्द करुन तसेच विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

५. वर नमूद २० पदे ही शासन सेवेतील पदांप्रमाणेच असल्याने सदरची पदे शासन सेवेतील या पदांच्या सेवा प्रवेश नियमांनुसार भरण्यात यावीत.

६. सदर प्रकरणी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडई-१ - २०५३ - जिल्हा प्रशासन - (१०१) आयुक्त - (००) (०१) आयुक्त, औरंगाबाद, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, आस्थापना खर्च - (२०५३ १ २५८)८, या लेखा शिर्षाखाली टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. हे आदेश महसूल व वन विभागाच्या सहमतीने विधी व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. R.I.No.११८६-२०१५/E dtd.१८.१२.२०१५; नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३/१४७५, दि.११.०१.२०१६ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५७/विसु-१, दि.२६.०२.२०१६ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७२११५२५२५६४१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul C Attar

Digitally signed by Ainul C Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul C Attar
Date: 2016.08.04 11:37:25 +05'30'

(अैनूल अत्तार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद (पत्राने),
२) जिल्हा न्यायाधिश, औरंगाबाद,
३) महालेखापाल-१/२ ( लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
४) विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद,
५) विभागीय महसूल आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर,

६) विभागीय महसूल आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती,
७) विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक,
८) विभागीय महसूल आयुक्त, पुणे विभाग, पुणे,
९) विभागीय महसूल आयुक्त, कोकण विभाग, बेलापूर, नवी मुंबई,
१०) पिठासिन अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद,
११) जिल्हा सत्र न्यायाधिश तथा पिठासीन अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण नागपूर
१२) जिल्हाधिकारी, औरंगाबाद,
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद,
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद,
१५) खाजगी सचिव, मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (अ.वि.वि.) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
१६) स्वीय सहाय्यक, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१७) स्वीय सहायक, प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) स्वीय सहायक, सह सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) स्वीय सहायक, उप सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) सर्व अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१) कक्ष अधिकारी (का-७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३) निवड नस्ती (का-४),
२४) कार्यासन-४, संग्रहार्थ.